**भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेची सन २०२६-२०२७ मध्ये अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्र. फुंफला-२०२६/प्र.क्र.९७/९-अे,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- ०८ मे, २०२६

संदर्भ:-

१) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. राफयो-२०१८/प्र.क्र. ४७/९-अे, दि. ६.७.२०१८
२) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. राफयो-२०२३/प्र.क्र. १८७/९-अे, दि.२१.०९.२०२३
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र. ४०/अर्थ-३, दि. ०९.०४.२०२६
४) संचालक (फलोत्पादन), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेले जाक्र/कृआ/फलो-२/भाफुंफलायो/प्र.मा.प्र/प्र.क्र. ९४२६/र-३८६/२०२६, दिनांक २४ एप्रिल, २०२६

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जे शेतकरी फळबाग लागवडीकरिता पात्र ठरु शकत नाहीत अशा शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने उपरोक्त **संदर्भ क्रमांक १** येथील शासन निर्णयान्वये भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सुरु केली आहे. तसेच **संदर्भ क्रमांक २** अन्वये योजनेच्या सुधारित मापदंडांना मंजूरी देण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र. **३** येथील शासन परिपत्रकान्वये सन २०२६-२०२७ च्या प्रथम नऊमाहीकरीता (डिसेंबर, २०२६ अखेर) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पीत निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ६० टक्केच्या मर्यादत वितरीत केला जाईल असे वित्त विभागाने कळविले आहे.**संदर्भ क्रमांक ४** येथील पत्रांन्वये संचालक (फलोत्पादन), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेची सन २०२६-२०२७ मध्ये अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत विनंती केली आहे. त्यास अनुलक्षून शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

१) राज्यात भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना या योजनेची सन २०२६-२०२७ मध्ये अंमलबजावणी करण्यासाठी अर्थसंकल्पित निधीच्या ६०% च्या मर्यादेत रु. ९९००.०० लाख (रुपये नव्व्याण्णव कोटी फक्त) इतक्या निधीच्या कार्यक्रमास खालीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| प्रवर्ग | अर्थसंकल्पिय तरतूद (रु. लाखात) | ६०% च्या मर्यादेत प्रशासकीय मान्यता (रु. लाखात) |
|---|---|---|
| सर्वसाधारण | १५०००.०० | ९०००.०० |
| अनुसूचित जाती | १०००.०० | ६००.०० |
| अनुसूचित जमाती | ५००.०० | ३००.०० |
| **एकूण रु.** | **१६५००.००** | **९९००.००** |

२) चालू वर्षी या योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर तो प्रथमतः प्रलंबित प्रकरणासाठी वापरण्यात यावा. सदर प्रलंबित प्रकरणे निकाली निघाल्यानंतर उर्वरित निधी सन २०२६-२७ मधील पात्र लाभार्थ्यांसाठी वितरीत करण्यात यावा.

३) या योजनेसाठी उपलब्ध करुन देण्यात येणारा निधी त्या-त्या प्रवर्गाकरिता विहित केलेल्या लेखाशीर्षांतर्गत चालू वर्षी अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा.

४) सदर योजनेची संदर्भ क्रमांक १ व २ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयातील तरतुदी तसेच वेळोवेळी केलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने अंमलबजावणी करावी.

५) सदर योजनेंतर्गत विहित केलेल्या कार्यपद्धतीस अनुसरून आयुक्त (कृषि) यांनी क्षेत्रीय यंत्रणेस योजनेच्या अंमलबजावणीकरिता सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात.

६) संचालक (फलोत्पादन) यांनी सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबतचा आढावा वेळोवेळी घ्यावा व त्याबाबतचा अहवाल वेळोवेळी आयुक्त (कृषी) यांचेमार्फत शासनास सादर करावा.

७) सदर योजनेंतर्गत निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन विभाग व वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, प्रचलित अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.

८) सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र. ४०/अर्थ-३, दि. ०९.०४.२०२६ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०५०८१६२२०३०२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by DEEPAK BALKRISHNA RAUT
Date: 2026.05.08 16:23:05 +05'30'

**( दिपक बाळकृष्ण राऊत )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, उप मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
४) मा. मंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) मा. विरोधीपक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद/महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई-४०० ०३२.
६) सर्व सन्मानीय विधानपरिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य.
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९) अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०) सचिव (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
११) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
१२) सचिव (सामाजिक न्याय), सामाजिक न्याय व विषेश सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

१३) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
१४) संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) सर्व विभागीय कृषि सहसंचालक, महाराष्ट्र राज्य.
१६) सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी/तालुका कृषि अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७) सहाय्यक संचालक (लेखा-१) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) मुंबई /नागपूर,
१९) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
२०) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२१) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
२२) सहसंचालक लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५वा मजला, मुंबई -४०० ०३२.
२३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
२४) कक्ष अधिकारी (२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२५) निवड नस्ती/९अे